# जाहिरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१०

ठिकाण – ठाणे दिनाक १/२/२०१०

पोलीस आयुक्त, ठाणे शहर पोलीस घटकात दिनाक ८/३/२०१० रोजी पोलीस भरती आयोजित करण्यात आली आहे. उमेदवाराना या कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेले आवेदन अर्ज खाली सुचना १ मध्ये दर्शविल्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येतील. आवेदन अर्ज उमेदवारांने रु. ५०/– ची इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफट '' पोलीस आयुक्त ठाणे शहर '' या नावाने जमा केल्या नंतर देण्यात येतील. विहीत आवेदन अर्ज भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह व्यक्तिश: दादोजी कोंडदेव स्टेडियम ठाणे शहर या ठिकाणी दि. ८/३/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत येणा–या उमेदवारांना प्रवेश दिला जाईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

पोलीस आयुक्तालय ठाणे पोलीस घटकात खाली दर्शविल्या प्रमाणे पोलीसांची पदे भरण्यासाठी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे.

**१) पोलीस शिपाई** :. .

| अ. क्र | पद | अजा | अज | विमाप्र | विजा–अ | भज–ब | भज–क | भज–ड | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि | ३० | १४० | १३ | ९ | १९ | १७ | ११ | ५२ | ३७७ | ६६८ |
| २ | बॅडस्मन | ०१ | ०१ | – | – | – | – | – | – | – | ०२ |
| ३ | एकूण | ३१ | १४१ | १३ | ९ | १९ | १७ | ११ | ५२ | ३७७ | ६७० |

२) ०२(दोन) पदे बॅडस्मनची भरली जातील.

**३) वरील रिक्त पदांमधून वाहन चालकांचीही पदे भरण्यात येतील. सदर भरती प्रकीयेत निवड झालेल्या उमेदवारापैकी ज्यांचेकडे वाहन चालकाचे परवाने आहेत, त्यांची वाहन चालक पोलीस शिपाई पदी नियुक्ती केली जाईल. जर एखाद्या उमेदवाराने चालक पोलीस शिपाई पदी नियुक्ती नाकारली तर त्यांचा कुठल्याही पदासाठी नियुक्तीचा हक्क राहणार नाही.**

खेळाडू,माजी सैनिक,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त,गृहरक्षक दल,महिला यांचे करीता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. (संदर्भ:शासन परिपत्रक क्र/ .. एसआरव्ही–१०९७/प्र.क्र ३१/९८/१६–अ,दि..१६/०३/१९९९)

**टिप** : १) वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असु शकते,त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका–यास राहतील. सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यात आलेली आहेत.

**२) दि.१०/०८/०९ व दि.०९/११/०९ च्या पोलीस भरती अनुषंगाने उमेदवाराने घेतलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. त्यांनी परत अर्ज विकत घेण्याची आवश्यकता नाही.**

**वेतन श्रेणी:** शासन वित्त विभाग अधिसुचना क्र.वेपुर १२०९/प्र.क्र.२७/सेवा–०९ दि.२२/०४/०९ अन्वये पोलीस शिपाई पदाकरीता मंजूर करण्यात आलेल्या वेतन श्रेणी नुसार अनुज्ञेय वेतन व भत्ते. शासन निर्णय अं.नि.ओ.१००५५/१२६/सेवा–४,दि.३१/१०/०५ अन्वये नियुक्तीस पात्र ठरणा–या पोलीस शिपायास '' परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना '' लागू ठरेल.

**वयोमर्यादा:** दि २८/२/२०१० रोजी वय १८ वर्षे पुर्ण आणि २५ वर्षा पेक्षा अधिक नसावे. मागासवर्गीयांना ५ वर्षे शिथिलक्षम.

**तसेच ज्या उमेदवारांनी दि. १०/८/२००९ रोजी पर्यंत अर्ज विकत घेतले असतील त्यांची वयोमर्यादा दि.३१/७/०९ रोजी व ज्या उमेदवारांनी दि.९/११/२००९ रोजी पर्यंत अर्ज विकत घेतले असतील त्यांची वयोमर्यादा दि.३१/१०/२००९ रोजी निश्चित करण्यात येईल.**

**शैक्षणीक अर्हता** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी )किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली सिनीयर सेकेंडरी स्कूल परिक्षा तसेच सीबीएसई बारावी परिक्षा या दोन्ही परिक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यात येणा—या १२ वी इयत्तेच्या परिक्षेशी समकक्ष आहेत.) घोषित केलेली परिक्षा उत्तिर्ण असणे आवश्यक आहे.

**शारीरिक पात्रता: महिला** : किमान उंची १५५ सें.मी.
**पुरुष:** किमान उंची १६५ सें.मी

**छाती:** न फुगविता ७९ से.मी.(न फुगविलेली छाती व फुगविलेली छाती यातील फरक ५ सेंमी. पेक्षा कमी नसावा.)

**चाचणी :** शारीरिक पात्रता पूर्ण करणा—या उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी, ७५ गुणांची लेखी चाचणी आणि २५ गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

**शारीरिक चाचणी खालील प्रमाणें राहील**

**पुरुष** १) १०० मिटर्स धावणे २) ८०० मिटर्स धावणे ३) पुल अप्स १०
४) लांब उडी ५) गोळाफेक

**महिला** १) २०० मिटर्स धावणे २) ३ कि.मी. चालणे ३) लांब उडी
४) गोळा फेक ( ४ कि.ग्रा ).

**लेखी चाचणी पुढील प्रमाणे राहील** : १) अंकगणित
२) सामान्यज्ञान व चालू घडामोडी
३) मराठी भाषेत निबंध लेखन

**नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतूद :** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या अनुसुचित जमातीसाठी व नक्षलवाद्यांच्या हल्लयात मृत/गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार,पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील इयत्ता ७ वी परिक्षा उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतात.

तसेच सदर महिला व पुरूष उमेदवारांना उंची मध्ये २.५ सेमी सुट देय राहिल आणि पुरूष उमेदवाराच्या छातीच्या मोजमापात सुट देय राहिल.

(टीप : ही तरतूद शासन निर्णय क्र.एनएएक्स—२००४/प्र.क्र.४८/विशा—१ ब, दि. ७/१२/२००४ च्या नुसार घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागामध्ये (जिल्हयामध्ये) होणा—या पोलीस भरतीसाठी आहे. इतर ठिकाणी ही सुट मिळणार नाही. तसेच असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाही.

**बॅडस्मन** :बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणा–या उमेदवारांना बॅन्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. बॅडस्मन पदासाठी १० वी परिक्षा उत्तीर्ण अर्ज करु शकतील.

तसेच सदर उमेदवारांना उंची मध्ये २.५ से.मी. व छाती मध्ये २ से.मी.न फुगविता / १.५. सें.मी. फुगवून इतकी सुट देय राहील. सदर सवलत देण्याचे अधिकार पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना राहतील.

**महिलांसाठी आरक्षण** : उपरोक्त नमूद घटकातील पदामध्ये शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी ३०% इतके समांतर आरक्षण असून एखाद्या संवर्गात त्याप्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे पात्र पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ–२०००/प्र.क्र.–४१५/का–२,दि.२५/०५/२००१ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार महिलांसाठी राखीव असलेल्या ३०% समांतर आरक्षणाकरीता (अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती वगळून) नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**गृहरक्षक दल ( होमगार्ड )आरक्षण** : एकूण पदांच्या ५% इतके समांतर आरक्षण पदे गृहरक्षक दलातून भरण्यात येतील. उमेदवाराच्या भरतीच्या दिनांकापूर्वी अथवा भरतीच्या नियोजित दिनांका पर्यंत गृहरक्षक दलामध्ये कमीतकमी तीन वर्षे सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

**माजी सैनिक आरक्षण** : एकूण पदांच्या १५% इतके समांतर आरक्षण पदे ही माजी सैनिकातून भरण्यात येतील. तसेच त्याच्या वयामध्ये त्यांची सेवा सैन्य दलात जितकी सलग सेवा ( ६ महिन्यांपेक्षा कमी नाही.) झाली असेल तेवढी वर्षे अधिक तीन वर्षे इतकी सवलत देय राहिल.

**प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त आरक्षण:** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.भुकंप–१००९/प्र. क्र–२०७/२००९/१६अ,दि.२७/०८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांच्यासाठीच राखून ठेवून या आरक्षणांअंतर्गत भुकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू राहिल.शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील

.

**शासन निर्णय क्रमांक – न्यायप्र.१००९, प्र.क्र.२०२ /०९/१६–अ, दि. २७/१०/२००९ अन्वये प्रकल्प ग्रस्त व भुकंप ग्रस्तांच्या नेमणूका संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानूसार उमेदवाराची पात्रंता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेनूसार करण्यात येतील.**

**खेळाडू उमेदवार** : एकूण पदांच्या घटक निहाय ५% पदे खेळाडू उमेदवारातून भरण्यात येतील.खेळाडूंबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशानुसार भरण्यात येतील.सदरची सुट फक्त पुढे नमूद क्रिडा कामगिरी करणा–या खेळाडूसाठीच देय राहिल. १)राज्यस्तर (आंतरजिल्हा) पदक विजेता २) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तर प्रतिनिधीत्व ३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधीत्व ४) आंतर राष्ट्रीय स्तर प्रतिनिधीत्व.

**मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. प्रशि/पोशि–भरती/खेळाडू–प्रमाणपत्र तपासणी/२००९/५०५५,दि.०७/१२/२००९ अन्वये खेळाडू उमेदवाराने त्यांचे खेळाविषयीचे प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कडून तपासणी केलेले असणे आवश्यक राहिल.**

**खेळांची नावे :**

| | | |
|---|---|---|
| १) आर्चरी (धनुर्विद्या) | २) अॅथलेटिक्स व क्रॉस कन्ट्री | ३)अॅक्वेटिक्स (पाण्यातील खेळ) |
| ४) बॅडमिंटन | ५) बॉक्सिंग | ६)बास्केट बॉल |

| | | |
|---|---|---|
| ७) जिम्नॅस्टिक्स | ८) हॅण्डबॉल | ९)खो–खो |
| १०)ज्युडो | ११) कबड्डी | १२)रोवींग |
| १३)लॉन टेनिस | १४) शुटींग | १५)वेट लिफ्टींग |
| १६)टेबल टेनिस | १७) व्हॉलीबॉल | १८)तायकॉन्दो |
| १९)कुस्ती | २०) हॉकी | २१)बिलीयर्डस् व स्नूकर |
| २२)फूटबॉल | २३) कराटे | २४) पॉवर लिफ्टींग |
| २५)बॉडी बिल्डींग | २६) क्रिकेट | २७)कॅनोईंग–कयाकिंग (होडी वल्हविणे) |
| २८)रग्बी | | |

तसेच पुरूष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से.मी. इतकी सुट देय राहिल.

## अर्जदारासाठी आवश्यक सुचना :

१)''आवेदन अर्ज '' हे खालील ठिकाणी वितरीत केले जातील.
ठिकाणांची नांवे (दिनांक ८/२/२०१० ते ५/३/२०१० या दिवशी वेळ १०.३० ते १७.०० वाजे पर्यन्त)
१) पोलीस उप आयुक्त,परि–१,ठाणे कार्यालय २) पोलीस नियंत्रण कक्ष,परिमंडळ २,भिवंडी ३) पोलीस नियंत्रण कक्ष,परिमंडळ ३,कल्याण ४) पोलीस नियंत्रण कक्ष,परिमंडळ ४,उल्हासनगर

२) ''आवेदन अर्ज '' जमा करताना रु. ५०/– ची इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट ''पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या नावाने देण्यात यावा.

३) छाननीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणे बंधनकारक आहे.

४) अर्जदाराने अर्जासोबत (लागू असलेल्या) प्रमाणपत्रांची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका–याने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शांळा सोडल्याचा दाखला.
२) शैक्षणिंक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक.
**३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रंक क्र. बीसीसी:–२००९/प्र.क्र.२९१/०९/१६ ब, दि. ५/११/२००९ नुसार मागासवर्ग उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदारांनी जात वैधता प्रमाणपत्रं सादर केल्या शिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.**
४) प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र.
५) अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र
६) सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलीअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र.
७) विविध आरक्षण प्रवर्गात मोडणा–या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

**प्रमाणपत्राच्या छाननीच्यावेळी उमेदवारांनी उपरोक्त मुळ ( Original ) प्रमाणपत्रे दाखविणे बंधनकारक आहे.मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

१) सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करणेस पात्र रहातील.

२) सदर पोलीस भरतीची विस्तृत माहिती www.maharashtra.gov.in/www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध राहील.

३) पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रीये बाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

४) पोलीस भरती प्रकीयेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

५) भरती प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

( एस.के.वर्मा )
अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन)
ठाणे शहर